प्रेक्षकाशी गप्पा मारु नयेत किंवा वेफर्स खाऊ नयेत ही आचरसंहिता आपल्यापैकी किती जण पाळतात?

महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा आणि अनेक स्तरांवरती भरवल्या जाणाऱ्या नाट्यस्पर्धा यांनी रंगभूमीला दिलेलं योगदान हे महत्वाचं आहे. परंतु एकेकाळी राज्य नाट्यस्पर्धांनी व्यावसायिक रंगभूमीला लेखक, दिग्दर्शक, कलावंत, तंत्रज्ञ भरभरुन दिले ते प्रमाण आता खूपच कमी झालेलं आहे. याचं मुख्य कारण तीन दशकांपूर्वी स्पर्धेत होणारी नाटकं कथानकप्रधान होती. ज्यांचा आजचे काही तरुण रंगकर्मी 'गोष्ट सांगणारी नाटकं' म्हणून तुच्छतादर्शक उल्लेख करतात. ती नाटकं व्यावसायिक रंगभूमीला जवळची वाटली. पुढे प्रायोगिकतेकडे झुकणारी नाटकं भरपूर प्रमाणात येऊ लागली आणि हा ओघ आटला. सध्या तरी परिस्थिती अशी आहे.

स्पर्धात नेमल्या जाणाऱ्या परीक्षकांविषयी इथं थोडं बोलायला हवं. वास्तविक स्पर्धांची विश्वासार्हता ही परीक्षकांच्या अर्हतेवर अवलंबून असते. परंतु अनेक स्पर्धांतून उपलब्धता ह्या एकमेव निकषावर परीक्षक नेमले जातात. परीक्षकांचा घसरता दर्जा आणि परिणामी स्पर्धांची घटणारी विश्वासार्हता ही थांबवायला हवी असेल तर परीक्षकांचा दर्जा सुधारायला हवा. नाट्यपरिषदेनं यासाठी परीक्षक प्रशिक्षण कार्यशाळा सुरु करावी. या कार्यशाळेत लेखन, दिग्दर्शन, अभिनय, प्रकाशयोजना, नेपथ्य, पार्श्वसंगीत या घटकांचं परीक्षण कसं करावं यासंबंधी सखोल मार्गदर्शन तज्ज्ञांकडून व्हावं. अशा प्रशिक्षित परीक्षकांची यादी परिषदेकडे असेल. शासनासकट ज्या स्पर्धक संयोजकांना आपली स्पर्धा जास्तीत जास्त निकोप आणि विश्वासार्ह व्हावी अशी तळमळ असेल ते याचा फायदा घेतील असा मला विश्वास आहे.

अभिनय कार्यशाळा या नावाखाली धंदा करणारी काही मंडळी या क्षेत्रात शिरली आहेत. सिरिअलमध्ये काम मिळवून देण्याचं आमिष दाखवून, बड्या बड्या कलावंतांची नावं देऊन, भरमसाट फी उकळून या तथाकथित कार्यशाळा भरवल्या जातात. त्याना धड अभ्यासक्रम नसतो, मार्गदर्शकांना आवश्यक ज्ञान आणि अधिकार नसतो. आणि शेवटी निराशा पदरी पडते. बालनाट्यांच्या काही शिबिरांत मुलांकडून नाटकं बसवून घेतली जातात आणि त्यांना काहीही मानधन न देता त्यांच्याकडून व्यावसायिक प्रयोग करवून घेतले जातात. माझं हे विधान सरसकट